# राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य
डॉ.नायडू रुग्णालय आवार,पुणे-१

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५९५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : crs_d83@yahoo.com


जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/ज मृ प्रमाणपत्र/4687-5307/२०१२ दिनांक :-18 जुलै २०१२

**परिपत्रक -**

विषय :- जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ प्रमाणपत्राची प्रथम प्रत मोफत देणे बाबत...

जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ व महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी नियम २००० मधील वैधानिक तरतुदींनुसार राज्यामध्ये जन्म-मृत्यु ची नोंद्णी होऊन प्रमाणपत्र अदा केले जातात. उक्त अधिनियमातील कलम १२ व नियम ५(३) व ८(१) अनुसार जन्म-मृत्यु घटना घडल्यापासून २१ दिवसांच्या आत नोंदणी केली असल्यास प्रथम प्रत विनामुल्य (मोफत) देण्याची तरतूद आहे.

परंतू राज्या मध्ये बहुतांश महानगरपालिका, नगरपालिका तसेच ग्रामपंचायती मार्फत अदा होणाऱ्या प्रथम जन्म-मृत्यु प्रमाणपत्रांना फी आकारणी करण्यात येत असल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आलेले आहे. तथापी या परिपत्रका द्वारे सुचीत करण्यात येते की, अधिनियम व नियमातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन होईल असे पहावे. या करिता प्रथम प्रत दिल्याच्या दिनांकाची नोंद मुळ अभिलेख (नमुना क्र.१ व २) मध्ये घेण्यात यावी.

तसेच जन्म व मृत्यु प्रमाणपत्र केंद्र शासनाने विहीत केलेल्या नमुना क्र. ५ व ६ या मध्येच देण्यात यावा. सोबत नमुना क्र. ५ व ६ जोडण्यात येत असून आपल्या अधिनस्त सर्व निबंधक/उपनिबंधक यांना परिपपत्रकाच्या प्रती पाठवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रती,
१) कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
२) आरोग्य अधिकारी, महानगरपालिका ................ (सर्व)
३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद ............ (सर्व)
प्रत सस्नेह :- उपसंचालक, आरोग्य सेवा, (परिमंडळ) ........... (सर्व)
प्रत माहितीसाठी सविनय सादर :- मा. संचालक, आरोग्य सेवा, महराष्ट्र राज्य, मुंबई

E:\83\Circular.doc